**ठळक बातम्या**

- जग सध्या युद्धाच्या छायेत असून त्यावर केवळ संवादाच्या मार्गानेच तोडगा निघू शकतो असं उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन

- स्थानीय लोकाधिकार समितीकडून युवांसाठी आयात-निर्यात लॉजिस्टिक्स प्रशिक्षण अभ्याक्रमाला आजपासून सुरुवात

- राज्यात सर्वत्र ईद उल फित्रचा उत्साह

- राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांचा राजीनामा

**आणि**

- इराणविरोधातली लष्करी कारवाई कमी करण्याचा विचार अमेरिका करत असल्याचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे संकेत

**<><><><><>**

जग सध्या युद्धाच्या छायेत असून त्यावर केवळ संवादाच्या मार्गानेच तोडगा निघू शकतो असं प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. नागपूर इथं भारतीय युवा संसदेच्या २९व्या राष्ट्रीय अधिवेशनाला ते संबोधित करत होते. भारतीय युवा संसद हे केवळ चर्चेचं व्यासपीठ नसून ते भविष्यात जबाबदार नागरिक घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे, असं उपराष्ट्रपती म्हणाले.

**- --- होल्ड- बाईट- उपराष्ट्रपती - - - -**

राज्यपाल जिष्णु देव वर्मा कार्यक्रमाला उपस्थित होते. युवापिढीचं सामाजिक आणि सांस्कृतिक योगदान ही भविष्यात महत्त्वाचं ठरणार असल्याचं ते आपल्या भाषणात म्हणाले.

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आले असून आज मुंबईत ते रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षांत समारंभाला त्यांची उपस्थिती आहे. त्यानंतर मुंबईत लोक भवन इथे जैन दीक्षा समारंभाच्या कार्यक्रमालाही ते उपस्थित राहतील. उद्या २२ मार्चला पुण्याजवळ उरळीकांचन इथल्या निसर्गोपचार आश्रमाच्या स्थापना दिन कार्यक्रमाला उपराष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२१ मार्च २०२६ - शनिवार

**<><><><><>**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्थानीय लोकाधिकार समितीकडून युवांसाठी आयात-निर्यात लॉजिस्टिक्स प्रशिक्षण अभ्याक्रमाला आजपासून सुरुवात झाली. मुंबईत शिवसेना भवन इथं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत याचं उद्घाटन झालं. शिवसेना भवन इथं तीस विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीचा प्रशिक्षण वर्ग आजपासून सुरू होत आहे, अशाचप्रकारचे वर्ग राज्यभरात सुरू करण्याचा आपला मानस असल्याचं ठाकरे वार्ताहरांशी बोलताना म्हणाले. लॉजिस्टिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी आहेत, मात्र कौशल्याअभावी नोकरी मिळत नाही, त्यामुळेच हे प्रशिक्षण वर्ग सुरू केल्याचं त्यांनी सांगितलं.

या प्रशिक्षणाचा कालावधी सहा आठवड्यांचा असेल. यात लॉजिस्टिक आणि उद्योग क्षेत्रातल्या तज्ज्ञांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिलं जाईल. तसंच प्रात्यक्षिकाची संधीही उपलब्ध करून दिली जाणार आहे.

यावेळी दिवाकर रावते, अनिल देसाई, अनिल परब, विलास पोतनीस उपस्थित होते.

**<><><><><>**

ईद उल फित्र किंवा रमजान ईद निमित्त आज राज्यात सर्वत्र नमाजपठण करण्यात आलं. राजधानी मुंबईसह गावोगावी मशिदी आणि ईदगाहमधे प्रार्थनेसाठी गर्दी झाली होती. मुस्लिम समाजाने एकमेकांना शुभेच्छासह भेटवस्तू आणि मिठाई देत ईदचा सण साजरा केला. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि पोलीस तसंच प्रशासनातल्या अधिकाऱ्यांनी नमाजच्या ठिकाणी जाऊन मुस्लिम समुदायाला शुभेच्छा दिल्या.

**सांगली**त मुस्लिम जमियात ईदगाह परिसरात नमाज पठण करण्यात आली. दहा हजाराहून अधिक संख्येने मुस्लिम समुदाय उपस्थित होता. मिरज इथं रमजान ईदनिमित्त मुख्य नमाज पठण निमजगा माळ येथील शाही ईदगाह मैदानात पार पडले. तसंच २७ मशिदींमध्ये नमाज अदा करण्यात आली. **रत्नागिरी** जिल्ह्यात विशेष नमाज अदा करण्यासाठी मुस्लिम धर्मियांनी मशिदींमध्ये मोठी गर्दी केली होती.

**सोलापूर शहर आणि जिल्ह्यात** रमजान ईद निमित्त सामूहिक नमाज पठण करण्यात आलं. मुस्लीम समुदायानं एकत्र येत सामूहिक नमाज अदा करत सर्वांसाठी सुख-शांती साठी

प्रार्थना केली. आसार मैदान ईदगाह, अहले हादिस ईदगाह रंगभवन,पांगल मैदान इथंही हजारो मुस्लिम धर्मीय नमाज साठी एकत्र जमले.

**नागपूरच्या** ऐतिहासिक मोमिनपुरा भागातील गरीब नवाज मशीद परिसरातही सकाळपासून आनंदाचं आणि उत्साहाचं वातावरण पाहायला मिळालं. यावेळी नागपूर पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुस्लीम समुदायाला ईदच्या शुभेच्छा दिल्या. सुरक्षेच्या दृष्टीनं नागपूर पोलिसांनी शहरभर कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे. विविध भागांमध्ये फिक्स पॉईंट्स उभारण्यात आले असून बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यंदाची सुरक्षा व्यवस्था अधिक चोख असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी बातमीदारांशी बोलताना दिली. हिंदू-मुस्लीम ऐक्याचं प्रतीक असलेल्या या भागात दोन्ही समाजातील नागरिकांनी एकत्र येत ईदचा आनंद साजरा केला.

**अहिल्यानगर** जिल्ह्यात विविध ईदगाह मैदानावर नागरिकांनी नमाज अदा केली. शहरातील कोठला परिसरातील ईदगाह मैदानावर आज सकाळी १० वाजता सामुदायिक नमाज अदा करण्यात आले.

**अकोला** इथं शहरातील हरिहर पेठ मधल्या ऐतिहासिक ईदगाहवर मुक्ती आजम मौलाना गुलाम मुस्तफा साहब यांच्या नेतृत्वात विशेष नमाज अदा करण्यात आली. यावेळी मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वाशीम** शहरासह जिल्ह्यातील रिसोड, मालेगाव, मंगरूळपीर, कारंजा आणि मानोरा तालुक्यातही रमजान ईद शांततेत आणि उत्साहात साजरी होत आहे. सणाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस प्रशासनाकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण आत्मसंयम, वंचितांबद्दल करुणा बाळगण्याची तसंच दानधर्म करण्याची शिकवण देतो असं राष्ट्रपती आपल्या संदेशात म्हणाल्या. सर्वांच्या हृदयात आशा, सौहार्द आणि करूणा रुजावी अशी प्रार्थना उपराष्ट्रपतींनी केली.

तर या मंगलप्रसंगी सर्वांना आनंद, सुख, उत्तम आरोग्य आणि समृद्धी लाभो अशी कामना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली.

राज्यपाल जिष्णुदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही राज्यातल्या जनतेला ईदनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पारसी बांधवांना नववर्ष नवरोजच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे नवं वर्ष सर्वांना समृद्धी आणि आनंदाचं जावो असं त्यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटलंय. तसंच त्यांनी सर्वांचं उत्तम आरोग्य आणि आकांक्षापूर्तीसाठीही प्रार्थना केली.

<><><><><>

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी काल आपल्या पदाचा राजीनामा दिला. कथित बलात्कार प्रकरणातील आरोपी अशोक खरात याच्याशी संबंध असल्याच्या आरोपावरून चाकणकर यांच्यावर टीका होत होती. वैयक्तिक कारणावरून आपण राजीनामा देत असल्याचं चाकणकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात म्हटलं आहे. चाकणकर या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडी प्रमुख असून त्यांनी या पदावरूनही  पायउतार होत असल्याचं पत्र पक्षाच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार यांना दिलं आहे. अशोक खरात प्रकरणाची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली असून दोषींवर कडक कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

<><><><><>

इराणविरोधातली लष्करी कारवाई कमी करण्याचा विचार करत असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलंय. ट्रूथ सोशलवर केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलंय की लष्करी कारवाईचं उद्दिष्ट जवळपास पूर्ण होत आलं आहे, त्यामुळे मध्य-पूर्वेतल्या लष्करी कारवाया कमी करण्याचा विचार सुरू आहे. २८ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या युद्धाला विराम देण्याची त्यांची तयारी असल्याचा संकेत या पोस्टमधून मिळत आहे.

अमेरिका आणि इस्त्रायलच्या हल्ल्यांना इराण जोरदार प्रत्युत्तर देत आहे. या आठवड्यात इस्त्रायलनं इराणमधील गॅस क्षेत्रावर हल्ला केल्यानंतर इराणनं देखील कतारमधल्या जगातल्या सर्वात मोठ्या एलएनजी पुरवठादार प्रकल्पावर हल्ला केला. परिणामी गॅस आणि तेलाच्या किमती झपाट्यानं वाढल्या.

<><><><><>

नवी दिल्लीत भारत इलेक्ट्रिसिटी परिषदेमधे महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या स्टॉलला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. या स्टॉलमध्ये महापारेषणची प्रगती, ध्येय-उद्दिष्टे, तसेच २०३० पर्यंतचे नियोजन याबाबत डिजिटल माध्यमातून माहिती सादर करण्यात आली. ड्रोन आणि मोबाईल ऍपद्वारे पारेषण वाहिनी पेट्रोलिंग, एम टी ए एम सी सबस्टेशन ऑटोमेशन प्रणाली यांसारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देण्यात आली.

केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहरलाल खट्टर, ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक, महाराष्ट्राच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना  बोर्डीकर यांनी या स्टॉलला भेट दिली.

<><><><><>

आज आंतरराष्ट्रीय वन दिनानिमित्त, केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी देशवासियांना वनांचं रक्षण करण्याची शपथ घेण्याचं आवाहन केलं. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेनं २०१२ मध्ये २१ मार्च हा आंतरराष्ट्रीय वन दिन म्हणून घोषित केला.

<><><><><>

चंद्रपूरच्या जलनगर वार्ड परिसरातून मेफेड्रोन या अमली पदार्थाचा मोठा  साठा स्थानिक पोलिसांच्या गुन्हे शाखेनं जप्त केला आहे. यात

55 ग्रॅम MD पावडर आणि दुचाकीसह सुमारे साडेतीन लाख रुपयांचा मुद्देमाल असून एका व्यक्तीला अटक केली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून पुढचा तपास सुरु असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

अकोला जिल्ह्यात गुरुवारी रात्री वादळी वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसानं १२ गावांतल्या सुमारे १२२ हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं. यात पातुर तालुक्यातली दोन, अकोटमधली नऊ तर अकोल्यातल्या एका गावाचा समावेश आहे. बागायती गहू, हरभरा, ज्वारी, मका, कांदा, तसंच पपई संत्रा, टरबूज, केळी, आंबा आदी पिकांसह भाजीपाला पिकांचा समावेश आहे. जिल्हा प्रशासनाच्या प्राथमिक अहवालात ही माहिती देण्यात आलीय.

//<><><><><>//